**CNRNOMHOS120003502019**
**विशेष दिवाणी दावा क्र. ०९/२०१९**
**सरस्वती व एक वि. मधुकर व इतर**
**नि.क्र.८३ खालील आदेश**
**(आदेश दि.११/०३/२०२६)**

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादी याने मुळ दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** **अर्जातील थोडक्यात कथने अशी की,**

वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याविरुध्द वडिलोपार्जित जमीनीचे व घरजागेचे वाटप करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्र. २ हिने दावा मिळकतीपैकी मौजे डिकसळ, ता. कळंब येथील सर्वे नंबर १६/अ/९ ग्रामपंचायत घर नं. १९०६ प्लॉट क्र. ८ व ९ मधील क्षेत्र २२३.४ चौ.मि. ही ईलाही दगडु आतार यांना विक्री केलेले आहे. तो व्यवहार बेकायदेशीर आहे. तो वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही. वादीला त्या अनुषंगाने दाव्यात मजकूर नमूद करावयाचा आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज.

**३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादी विनाकारण प्रकरण लांबवत आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रकरणात बदल होण्याची शक्यता दर्शविली आहे. त्यांनी शेवटी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी विकल्पे अशी विनंती केली आहे की, अर्ज मंजुर करणे झाल्यास प्रतिवादी क्र. २,३ व ४ यांना खर्चाची रक्कम रुपये ५०००/- देण्याबाबत वादीला आदेशित करण्यात यावे.

**४.** उभयपक्षकारांच्या विधिज्ञांचा युकतीवाद ऐकला.

**५.** अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

**६.** वादीचे कथन की, प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २ हिने दावा मिळकती पैकी, दावा मिळकत घर क्र. १९०६ ही दिनांक ०६.०८.२०२० रोजी ईलाही दगडु आतार यांना विक्री केली याला निशाणी क्र. ८१/१ वर दाखल केलेल्या सुची क्र. २ च्या नकलेने पुष्ठी मिळते. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीची वाटणी होऊन तिला स्वतंत्र

कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा मिळकतीचे स्वरुप विचारात घेता व प्रतिवादी क्र. २ ने वर नमूद केलेला व्यवहार लक्षात घेता वादी दाव्यात मागत असलेली दुरुस्ती ही वाद मुद्याचे योग्य निराकरण करण्यासाठी गरजेची वाटते. तसेच, प्रस्तावित दुरुस्ती प्रामाणीक स्वरुपाची दिसून येते. अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीच्या हक्काला कोणतीही बाधा पोहचणार नाही. त्यामुळे प्रस्तुतची दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

## आ दे श

**१.** निशाणी.क्र.८३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** वादीने आज तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात मागणी दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करावी.

**३.** प्रस्तुत अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.03.18 17:37:59 +0530

ठिकाण – भूम
दिनांक – ११/०३/२०२६.

**(रा. द. डांगे)**
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
भूम.

वि.दि.दा.क्र.०९/२०१९
निशाणी क्र.८३

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 11/03/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 13/03/2026 |
| Order uploaded on | --- | 18/03/2026 |